Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - IV

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Anil Chidrawar
C Principal
cation Society's
egloor Dist.Nanded

Chole

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - IV January - March - 2019

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.), M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

# CONTENTS OF MARATHI PART - IV


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | २१ व्या शकतकातील भारतीय लोकशाही : आव्हाने आणि पुढील वाटचाल<br>डॉ. अशोक सोनकांबळे | १-४ |
| २ | लोकशाही व लोकसंख्या शिक्षणाचा वैज्ञानिक दृष्टीकोन<br>प्रा. जी. व्ही. पांचाळ | ५-७ |
| ३ | भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने<br>प्रा. विलास गायकवाड | ८-१२ |
| ४ | भारतातील लोकशाही आणि आर्थिकसुधारणा<br>डॉ. गोविंद राजाराम परडे | १३-१६ |
| ५ | भारतीय समाजातील आदिवासी व अल्पसंख्याकांच्या समस्या<br>डॉ. शिवाजी पवार | १७-२३ |
| ६ | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>प्रा. राजेश अनंतराव कांबळे | २४-२७ |
| ७ | लोकशाही संकल्पना आणि वास्तव<br>डॉ. उमाकांत राठोड | २८-३० |
| ८ | आदिवाीस समाजाच्या समस्या : समाजशास्त्रीय अध्ययन<br>रत्नपारखे शिवशंकर अशोकराव | ३१-३५ |
| ९ | नागरी समाज आणि लोकशाही<br>रेणुका शिवाजी ईश्वरे | ३६-४० |
| १० | दलित, आदिवासी समाज आणि अत्याचार प्रतिबंधक कायदा<br>प्रा. संजय मारोतराव देबंडे | ४१-४६ |
| ११ | भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने<br>डॉ. शंकर लेखणे | ४७-५० |
| १२ | महिलांच्या सामाजिक व आर्थिक सबलीकरणात शासनाची भूमिका : एक अभ्यास<br>डॉ. ज्योती पुंजाराम महाजन | ५१-५५ |
| १३ | नागरी समाज आणि लोकशाही<br>डॉ. बाळासाहेब भिंगोले | ५६-५७ |

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - IV



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने : एक अभ्यास<br>**कु. फुलारी ज्योती महिशंकर** | ५८-६१ |
| १५ | लोकशाही सक्षमीकरणात ग्रंथालयाची भूमिका<br>**सहा. प्रा. संगिता गंगाराम उतेकर** | ६२-६७ |
| १६ | न्यायव्यवस्था व संसदीय शासनातील संघर्ष<br>**Madhav Chole** | ६८-७५ |
| 17 | A Study on "Role of Mahila Aayog in Safeguarding the Rights of Women" with Specificreference to Domestic Violence<br>**Prof. Dr. Manoj M. Painjane** | 76-83 |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

# १६. न्यायव्यवस्था व संसदीय शासनातील संघर्ष

Madhav Chole

सध्या 99 वी घटना दुरुस्ती आणि 'राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग कायदा' सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरविल्याने संसद आणि न्यायालय या शासन संस्थेच्या दोन घटकांमध्ये संघर्षाची स्थिती निर्माण झालेली आहे. पण हा संघर्ष काही नवा नाही. घटनेच्या अंमलबजावणी पासून चालू आहे. विशेषतः इंदिरा गांधीच्या काळात या संघर्षाचा लपंडाव चालू होता. या लेखामध्ये संविधानाने दोन्ही संस्थाचे आखुन दिलेले कार्ये, त्यांच्या मर्यादा, संसदेच्या सार्वभौमत्वाच्या तत्वाचे स्वरुप, संसद आणि न्यायपालिकेतील संघर्ष आणि या संघर्षातून संविधानात अपेक्षित असलेला लोकशाही समाजवाद कसा साध्य करता येईल याचा सुसंवादात्मक विचार याचा अभ्यास खालील प्रमाणे केलेला आहे.

**संविधानात्मक स्थान**

संविधानात प्रत्येक राजकीय संस्थांची भुमिका आखुन दिलेली आहे. त्या त्या संस्थाची भुमिका, कार्याची सिमा, इतर संस्थांशी संबंध, त्यांच्या सिमा, कशा असाव्यात या निश्चित केलेल्या आहेत. तसेच संविधानातील गुंता-गुंतीच्या कलमाचा आणि विवादाचा अर्थ लावण्याची जबाबदारी न्यायपालिकेवर सोपविलेली आहे. संविधानाने महत्वपूर्ण दोन संस्थांना स्वायत्तता दिलेली आहे. त्यात निवडणूक आयोग आणि न्यायपालिका. निवडणुक आयोग हे एका निश्चित कालावधीसाठी जनतेच्या संमतीची लोकसत्ता आणते म्हणून स्वतंत्र निपक्षपाती आणि निर्भिड निवडणूक आयोगाची व्यवस्था संविधान अनुच्छेद 324 ते 329 मध्ये करण्यात आलेली आहे. न्यायपालिका हि जनतेला न्याय देणारी आणि संविधानाचा निश्चित अर्थ लावणारी यंत्रणा आहे. म्हणून अनुच्छेद 124 ते 147 मध्ये स्वतंत्र व्यवस्था करुन कार्याची स्वायत्तता देण्यात आलेली आहे.

**संसदेच्या सार्वभौमत्वाचे तत्व** - कायदेमंडळ हे सर्वश्रेष्ठ असून त्याचे कायदे निर्माण करण्याचे अधिकार हे अंतिम आहेत. त्यावर कोणाच्याही मर्यादा नाहीत असे तत्व म्हणजे संसदेचे सार्वभौमत्व होय. इंग्लंडमध्ये संकेताने तिथल्या संसदेला कायदे निर्माण करण्याच्या बाबतीत अमर्याद अधिकार मिळालेले आहेत. भारतात मात्र संसदेच्या सार्वभौमत्वाचे तत्व मर्यादीत स्वीकारलेले आहे. संविधानाने संसदेने कायदे निर्मिती कोणत्या चौकटीत करावे हे आखुन दिलेले आहे. मुख्यता घटनात्मक तरतुदी विरोधी कायदा करता येत नाही. तसेच संविधानाच्या मुलभूत संरचेनचा धक्का लागेल अशी घटनादुरुस्तीही करता येत नाही. जर संसदेने घटनात्मक चौकटीचा भंग करणारे कायदे केले तर न्यायालय न्यायालयीन पुनर्विलोकनाद्वारे असे कायदे रद्द करते आणि केलेले आहेत.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

**सर्वोच्च न्यायालय व संसदिय शासन संघर्ष**

संविधानात संसद आणि सर्वोच्च न्यायालयास जे अधिकार प्रदान केलेले आहेत. त्याचा वापर करण्यावरुन संसद आणि सर्वोच्च न्यायालयात वारंवार संघर्षाची स्थिती निर्माण झालेली आहे. विशेषतः मुलभुत हक्क (मालमत्तेचा हक्क) आणि मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्यावरुन संसद आणि सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारलेली स्थिती आणि धोरणांमुळे भारतीय राजकिय व्यवस्थेत एक वादविवादांचा प्रश्न निर्माण झाला आहे.

1951 च्या शंकरीप्रसाद विरुध्द केंद्र सरकार या खटल्यात 1951 ला करण्यात आलेली पहिली घटनादुरुस्ती ही नागरिकांच्या मालमत्तेच्या मुलभूत हक्कांवर मर्यादा आणते, त्याचप्रमाणे कलम 13 (2) मध्ये तरतूद केलेल्या कायद्याच्या संकल्पनेत घटनादुरुस्ती देखील समाविष्ट होते. म्हणून या खटल्यात आव्हान देण्यात आले. यावरुन सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की संसदेला 368 व्या कलमानुसार मुलभूत हक्कातही संशोधन करता येते. आणि कलम 13 (2) मध्ये जी कायद्याची व्याख्या दिलेली आहे. त्यात संसदिय कायद्याचा समावेश होतो. एकंदरीत सर्वोच्च न्यायालयाने संसदेचा घटना दुरुस्तीच्या अधिकार मान्य केला. आणि संसदेने केलेल्या पहिल्या घटना दुरुस्तीला वैधता प्रदान केली.

1965 च्या सज्जनसिंग विरुध्द राजस्थान - या खटल्यात परत शंकरीप्रसाद खटल्यातील मुद्दे उपस्थितीत केले आणि संसदेच्या 17 व्या घटनादुरुस्तीला आव्हान देण्यात आले होते. मात्र याही निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने शंकरीप्रसाद खटल्यातील निर्णय कायम ठेवला. या काळातील सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय हे काटेकोर केवळ वैधानिक घटनात्मक दृष्टीकोणातून दिलेले होते.

गोलकनाथ विरुध्द पंजाब राज्य (1967) - पंजाबमधील गोलकनाथ या व्यक्तीची 418 हेक्टर जमीन त्याच्या मृत्युनंतर अतिरिक्त म्हणून पंजाब सरकारने काढुन घेतली. या कृतीस त्याच्या नातेवाईकांनी न्यायालयात आव्हान दिले. या खटल्यात सरकार अनुच्छेद 14, 19 मधील मुलभुत हक्कांवर अतिक्रमण करते. तसेच या अगोदरच्या पहिल्या, चौथ्या व सतराव्या घटनादुरुस्ती कायद्यांना आव्हान देण्यात आले. या खटल्यात सर्वोच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधिश सुब्बारावने सहा समर्थन व पाच विरोधक न्यायाधिशांच्या स्थितीत असा निर्णय दिला की संसद मुलभूत हक्कांत संशोधन करु शकत नाही. (समर्थन व्यक्तींचे मुलभुत हक्क मर्यादीत केले जाणार नाहीत)

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयावर टिका - भारतीय लोकशाहीत जनतेंच्या हितांचे संरक्षण प्रातिनिधिक संसद करते. तसेच संराद हिच जनतेला कोणत्या मर्यादेपर्यंत मुलभूत हक्क द्यावेत हे ठरविते. मात्र वरिल गोलकनाथ केसमधील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने संसदीय शासनपध्दतींच्या आधारास, तत्वास धोका निर्माण केला आहे. एम.सी.सीतलवाडच्या मतानूसार (महान्यायवादी) गोलकनाथ केसमधील बहुमतांचा निर्णय सांविधानिक दृष्ट्या उचित

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR * Dist.Nanded *



नाही. पी.के.त्रिपाठी (विधियेत्ता) च्या मतानूसार हा तर जनतेच्या जागी न्यायालयाचे सरकार प्रस्थापित कण्याचा प्रयत्न आहे.

1971 च्या लोकसभा निवडणुकीत श्रीमती इंदिरा गांधीच्या पक्षास बहुमत मिळाले. तिने असे जाहिर केले की, देशातील गरीबी, बेरोजगारी, सामाजिक, आर्थिक, विषमता समाप्त करण्यासाठी भाग-4 मधील मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणे आमचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी मुलभूत हक्कात संशोधन करणे आवश्यक वाटल्यास तसे केले जाईल. त्या दृष्टीनेच 24 वी, 25वी आणि 29 वी घटना दुरुस्ती करण्यात आली. (1) 1971-24वी दुरुस्ती - संसद मुलभूत हक्कात परिवर्तन अथवा संशोधन करु शकते. (2) 1971-25वी दुरुस्ती - मार्गदर्शकतत्वांतीलकलम 39 ब, किंवा क नुसार केलेले कायदे हे नागरिकांच्या भाग 3 मधील कलम 14, 19 आणि 31 वर अतिक्रमण होते. म्हणून अवैध ठरविता येणार नाही. त्यासाठी घटनेत 31 (क) हे नवे कलम समाविष्ट करण्यात आले. (3) 1972-29 वी दुरुस्ती - केरळ राज्याने जमीन सुधारणे बाबत केलेले दोन कायदे 9 व्या परिशिष्टात समाविष्ट करण्यात आले.

केशवानंद भारती विरुध्द केरळ राज्य (1973) - 1971 आणि 1972 च्या वर्षात जी 24 वी, 25 वी आणि 29 वी घटनादुरुस्ती करण्यात आली होती. या दुरुस्त्यास तसेच 1967 च्या गोलकनाथ -पंजाब राज्य केसमधील निर्णयासही 1973 च्या केशवानंद भारती विरुध्द केरळ राज्य केसमध्ये आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यात असा निर्णय दिला की संसद मुलभूत हक्कात परिवर्तन अथवा संशोधन करु शकते मात्र एखाद्या मुलभूत हक्कांच्या संशोधनामूळे जर संविधानाच्या मलुभूत संरचनेस धोका निर्माण झाल्यास ही संवैधानिक दुरुस्ती करता येणार नाही. यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे मुख्य मुद्दे पुढील प्रमाणे : (1) गोलकनाथ / पंजाब राज्य विवादातील दिलेला निर्णय रद्द.(2) संसद 368 नुसार संविधानाचा मुलभूत सिध्दांत मोडित काढू शकत नाही. (3) 1971 चा 24 वा संशोधन वैध. (4) 25 वी दुरुस्तीमधील 2 (अ) आणि (ब) वैध. (5) 25 वी संशोधनाची धारा 3 चा प्रथम खंड वैध. (6) 29 वी घटनादुरुस्ती वैध करण्यात आली.

राष्ट्रीय आणिबाणीतील बांधिल न्याययंत्रणा - ग्रॅनव्हिल ऑस्टीनच्या मते राष्ट्रीय आणिबाणीच्या काळात न्यायालयाचा अधिकारच मर्यादीत केला असे नाही तर बांधिल न्याययंत्रणा (Committed Judiciary) निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. अलाहाबाद उच्च न्यायालयाने निवडणुकीतील भ्रष्टाचाराच्या आरोपावरुन इंदिरा गांधींची लोकसभेवरील निवड रद्दबातल ठरविली होती. गांधीने त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते. तिने 1975 मध्ये 39 वी घटनादुरुस्ती करुन आजी आणि माजी पंतप्रधानांची व्यक्तींची निवड ही बाब न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारांपासून आलिप्त ठेवण्यात आले. या घटनादुरुस्तीची अंमलबजावणी मागील काळापासून करण्याचे घोषित केले. मात्र सर्वोच्च न्यायालयाने ही घटनादुरुस्ती अवैध ठरविले आणि इंदिरा गांधीची लोकसभेतील निवड वैध ठरविले.

आणिबाणीच्या काळात इंदिरा सरकारने 'राष्ट्रीय सुरक्षा कायदा' करुन सरकारला सकारण, निष्कारण अटक करण्याचा अनिर्बंध अधिकार दिला. तसेच राष्ट्रीय आणिबाणी मुळे नागरिकांना आपल्या हक्कांवरील अतिक्रमणामुळे न्यायालयातही जाता येत नव्हते. न्यायालयीन न्यायाधिशांच्या नियुक्त्यात राजकिय हस्तक्षेप वाढलेला होता. 1976 ला इंदिरा गांधी 42 वी घटना दुरुस्ती करुन संसदेची संविधानात संशोधन करण्याची कोणतीही सीमा नाही आणि संसदेने एखादी दुरुस्ती केल्यास त्याच्या विरोधात न्यायालयात आव्हान दिले जाणार नाही. तसेच यात मुलभूत हक्कांपेक्षा मार्गदर्शक तत्वांना महत्व देण्यात आले आणि अशी व्यवस्था करण्यात आली की, संविधानातील मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या कोणत्याही कायद्यास न्यायालयात मुलभूत हक्कांवरील अतिक्रमणामुळे आव्हान दिले जाणार नाही.

पाच सदस्यीय संविधान पीठाने 31 जूलै 1998 मध्ये मिनार्व्ह मिल्स केसमध्ये (4-1) अशा बहुमताने सर्वोच्च न्यायालयाने 42व्या संविधान संशोधनाचे प्रावधान खंड-4 आणि खंड-55 ला अवैध घोषित केले कारण त्यामुळे संविधानाच्या मुलभूत संरचनेस धोका निर्माण झाला होता. तसेच केशवानंद भारती विवादात न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द 42 वी घटनादुरुस्ती होती.

**1980 नंतर प्रबळ न्यायपालिका -** 1980 नंतर भारतीय राजकारणात आघाड्यांचे सरकारे आली हि सरकारे ठोस निर्णय घेवून जनतेच्या जीवनांचे संरक्षण, गरजा पूर्ण करण्यास असमर्थ ठरली, तसेच आपल्या जबाबदारीपासून, कर्तव्यापासून दूर गेली. भ्रष्टाचारास, वाईट वर्तनास, प्रोत्साहन देवू लागली. तसेच राजकिय अस्थिरता, पक्षांची लोकनुरंजनवादी भुमिका आणि ठोस कृतींचा अभाव यामुळे राजकिय पक्षांनी आणि सरकारनी जनतेची विश्वासार्हता गमाविली. याचा परिणाम म्हणून न्यायालयाला जनहित याचिकाद्वारे समाजहितासाठी अनेक निर्णय द्यावे लागले. त्यामुळे जनहित याचिकाद्वारे न्यायालयांच्या कृतिशिलतेत वाढ झाली. न्यायालयाने विधिमंडळाचे रुप धारण केले. न्यायालयाने जनहित याचिकांद्वारे वंचित, शोषित, बालमजूर, स्त्रीया, वेठबिगार, पर्यावरण, फुटपाथवर राहणारे लोक, भ्रष्टाचार, झोपडपट्टीत राहणारे लोक, इत्यादी प्रकरणांत कार्यकारी स्वरुप धारण केले. त्यामुळे न्यायालयावर लोकांचा विश्वास निर्माण झाला. म्हणूनच राजकिय विश्लेषक, राजामणी व सेनगुप्ता यांच्यामते न्यायमंडळ आधुनिक भारतातील एक प्रबळ व स्वतंत्र संस्था बनली आहे. न्यायालयीन प्रक्रियेचे अभ्यासक सत्यरंजन साठे यांच्या मते जनहितार्थ याचिकाद्वारे न्यायालयाच्या कृतिशिलतेत वाढ होवून न्यायालयाने कार्यकारी मंडळाचे रुप धारण केले आहे.

वाढत्या न्यायिक हस्तक्षेपामुळे राज्यघटनेतील अपेक्षित शासन संस्थामधील सत्ता संतुलनास धोका निर्माण होवू शकतो. त्यासाठी संसदेने आपली जबाबदारी, कार्य योग्य रितीने केले पाहिजे तर न्यायपालिकेने संविधानात्मक जबाबदारी पार पाडली पाहिजे.



ADAT VYAPARI ... SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

DAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

99 वी घटनादुरुस्ती आणि "राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग कायदा" घटना बाह्य

सध्या सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधिशांच्या नियुक्तीवरुन लोकशाहीतील महत्वपूर्ण संस्थेत, संसद आणि न्यायालयात संघर्ष निर्माण झालेला आहे. पण हा कांही नवा संघर्ष नाही. राज्यघटनेची अंमलबजावणी झाल्यापासून विभिन्न काळात विभिन्न मुद्यावरुन संघर्ष झालेला आहे. प्रचलित न्यायाधिश नियुक्तीच्या कॉलेजियम पध्दतीवर अपारदर्शकतेचा, न्यायाधिशांच्या वरचष्याचा आक्षेप वारंवार घेण्यात आलेला आहे. त्यामुळे न्यायाधिश नियुक्तीमध्ये लोकनिर्वाचित प्रतिनिधींचा सहभाग असावा. यादृष्टीने केंद्र सरकारने न्यायाधिशांच्या नियुक्त्या आणि बदल्या करण्याच्या दृष्टीने नवा "राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग कायदा" करुन संविधानात 99 वी संविधान संशोधन केलेले होते. त्याला न्यायालयात आव्हान देण्यात आले. आणि ते साहजिकच होते. सर्वोच्च न्यायालयाने 99 वी संविधान संशोधन आणि राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग कायद्याला घटनाबाह्य ठरविले आणि प्रचलित न्यायाधिश नियुक्तीच्या कॉलेजियम पध्दतीवरच भर दिला. सध्या न्यायाधिशांच्या नियुक्तीवरुन लोकशाहीच्या दोन आधारस्तंभात वाद - संघर्ष निर्माण झ ाला तरी घाबरण्याचे कारण नाही. कारण संविधानात विभिन्न संस्थात सत्ता-संतुलन साधलेले आहे. तसेच या प्रश्नांवर संसदेचा किंवा न्यायालयाचा विजय किंवा पराभव म्हणून न पाहता ज्या मुद्यावर वाद निर्माण झालेला आहे. त्यावरची चर्चा, मंथन, संविधानाचा सत्ता समतोल सांभाळुन केला आणि अधिकाधिकरित्या न्यायाधिशांच्या नियुक्त्या पारदर्शकपणे आणि योग्य व्यक्तींचे निवड कशी करता येईल कोणाचाही प्रभाव न राहता असे झाले तर ते भारतीय लोकशाहीसाठी फारच योग्य होईल. कारण भारतात इतर राजकीय संस्थापेक्षा लोकांना न्यायपालिकेवर जास्त भर आहे आणि ते सार्थक होईल. न्या.कृष्णा अय्यर यांनी इंग्लंडसारखी पारदर्शी व्यवस्था आणण्याचं जाहीर समर्थन केलं होतं. पारदर्शकता पात्र असलेल्यांना समान संधी आणि उत्तरदायित्व मुल्य अंगिकारणारी नियुक्तीची यंत्रणा न्यायव्यवस्थेला आणि लोकशाहीलाही बळकटच करेल. या दृष्टीकोणातून या सुधारणांकडे पाहिलं तर सरकार आणि न्यायव्यवस्था यांच्यातील संघर्षाचा मुद्दा उरत नाही.

न्यायाधिश नियुक्ती पध्दतीतील स्थित्यंतरे आणि आक्षेप - अनेक लोकशाही देशात न्यायाधिशांच्या नियुक्तीत लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींना कमी-अधिक प्रमाणात स्थान देणाऱ्या तरतूदी आहेत भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात न्यायाधिशांच्या नेमणूका 1919 व 1935 च्या कायद्याने सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधिशांच्या सल्याने राजकीय नेतृत्व करत होते. स्वातंत्र्यानंतर 124 व्या कलमानूसार नियुक्त्या सुरु झाल्या. घटनेनुसार न्यायाधिशांची नियुक्ती फक्त राष्ट्रपतींच्या म्हणजेच पंतप्रधानांच्या मर्जीवर अवलंबुन न ठेवता त्यांनी सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधिशांचा विचार घ्यावा आणि सल्लामसलत करुन नियुक्ती करावी. (कलम 124) 124 व्या कलमाचा अर्थ सर्वोच्च न्यायालयातर्फे सुरुवातीला असा लावण्यात आला की, नियुक्तीबाबत राष्ट्रपती सरन्यायाधिशांचा सल्ला घेतील, पण तो बंधनकारक नसेल. मात्र सरकारकडून हा अधिकार निरंकुश होत असल्याने पुढे लक्षात आले. यामध्ये आज अस्तित्वात असलेल्या कॉलेजियम

पध्दती उल्लेख नव्हता. आज या तरतूदीचा अर्थ कसा लावायचा यावर कायद्याची लढाई आहे. ते न्यायालयानेही वेगवेगळ्या प्रकारे लावला आहे. 1981 पूर्वी या नियुक्त्यांमध्ये कार्यकारी मंडळाचा वरचष्मा होता. सरन्यायाधिशांचा सल्ला घेत पण नियुक्ती सरकार करत होते. त्यासंदर्भातील एक याचिका जी 'फर्स्ट जजेस केस' म्हणून ओळखली जाते निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने नियुक्तीमधील सरकारचे अधिकार मान्य केले होते. न्या.पी.एन.भागवती यांच्या खंडपीठाने सरन्यायाधीश आणि उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांची भुमिका सल्लागाराची आहे. नियुक्तीची जबाबदारी सरकारची असं स्पष्ट केलं होतं. या पध्दतीवर ती न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यावर घाला घालत असल्याची टिका होत होतीच. सरकार मर्जीने वरिष्ठ न्यायाधिशांच्या बदल्या, नेमणूका करु शकत होते असा आक्षेप घेण्यात आला. या व्यवस्थेत आमुलाग्र बदल घडवला तो 'सेकंड जजेस केस' (1993) मधील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने सर्वोच्च न्यायालयातील वकिलांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवरील निर्णयात कॉलेजियम पध्दतीचा स्वीकार केला. या कॉलेजियममध्ये सरन्यायाधिश आणि त्यांचे दोन ज्येष्ठ सहकारी न्यायाधिश असतील. त्यांनी नाव सुचवलेल्यांची नियुक्ती करावी अशी पध्दत सुरु झाली. यावरही न्यायव्यवस्थेचा किंबहुना सरन्यायाधिशांचा पूर्ण वरचष्मा असल्याचा आक्षेप घेण्यात आला. 1998 मध्ये तत्कालीन राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाकडे स्पष्टीकरण मागणारी विचारणा केली त्यावरचा निर्णय 'थर्ड जजेस केस' म्हणून ओळखला जातो. या प्रकरणी ही कॉलेजियम पध्दत भक्कम केली. त्यासाठी 9 मार्गदर्शक बाबी घालून दिल्या. या निर्देशानुसार सरकार कॉलेजियमच्या शिफारशींचा फेरविचार करण्यास सांगू शकते आणि तोच निर्णय आतापर्यंत चालूच आहे.

न्यायाधिशांच्या नियुक्तीवरील पहिला काळ सरकारी वर्चस्वाचा नंतर पूर्णतः न्यायव्यवस्थेचा अधिकार अशी वळण या मुद्यावर झाली आहेत आणि दोन्हीतल्या त्रुटींवर भरपूर चर्चाही झालेली आहे. न्यायाधिशांच्या नियुक्त्या न्यायाधिशांनीच कराव्यात इतरांना कसलेच स्थान असू नये, यावरही टिका झालेली आहे. कॉलेजियमच्या पाया घालणाऱ्या याचिकेचा निर्णय करणाऱ्या न्या.जे.एस.वर्मा यांनीही नंतर या पध्दतीत त्रुटी असल्याचे सांगितले आहे. या निकालासाठी सर्वोच्च न्यायालयात [illegible] फली नारिमन हे देशातले एक नामवंत कायदेतज्ञ होते. त्यांनी तर एकदा मी सर्वोच्च न्यायालयात लढून जिंकलेल्या [illegible] एका प्रकरणावर खंत वाटत असेल तर ते कॉलेजियमचा निर्णय देणारे प्रकरण आहे. असे सांगत टिका केली आहे. या पध्दतीवर पारदर्शकतेचा अभाव आहे. हा सर्वात मोठा ठपका ठेवला जातो. [illegible] वशिलेबाजीपासून [illegible] काहीही शक्य असते. लोकशाहीतील समान संधी देणाऱ्या मूल्यांशी ही पध्दत विसंगत असल्याचाही आक्षेप घेतला जात होता. या [illegible] राजकिय पक्षांना हवी आहे. [illegible] सरकारच्या काळात [illegible] आयोगाने राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती [illegible]

[illegible] सरकारच्या [illegible] अशी शिफारस करण्यात आल्या.

ADAT VYAPARI ... SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

प्रशासकीय सुधारणा आयोग (2007), विधि आयोग अहवाल (2008) यांनीही कॉलेजियम बदलण्याच्या बाजुने मत दिले होते. तीनवेळा या विषयावर घटनादुरुस्ती विधेयक आणणारे कॉंग्रेस आणि भाजप अशा दोन्ही पक्षांच्या पुढाकारांची सरकार होती. या पार्श्वभुमीवर या सरकारने कॉलेजियम ही पध्दत बंद करणारी आणि नवीन पध्दत आणणारी घटना दुरुस्ती केली. या घटना दुरुस्तीचा विरोधकांनाही साथ दिली आणि 20 राज्यांनी पाठिंबा दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने ही घटनादुरुस्ती रद्द्यातल ठरविली. आणि ती न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करणारी असल्याचा आक्षेप उचलून धरला गेला आणि न्यायाधिशांच्या नियुक्तीत न्यायव्यवस्थेचाच शब्द अंतिम राहिल याचीही व्यवस्था केली गेली. या निकालाने केंद्राची न्यायव्यवस्थेतील मुलभूत सुधारणांची एक संधी गेली आहे. आता सरकार ठरवलं तरी इतर रजकिय पक्ष अशा प्रकारच्या घटनादुरुस्तीला मान्यता देण्याची शक्यता नाही. कॉंग्रेसने तसे जाहिरच केलेले आहे. तसेच निकालानंतर न्याययंत्रणेवर अतिक्रमणाचा प्रयत्न फोल ठरल्याच्या प्रतिक्रियाही आल्या. आपल्याकडे लोकप्रतिनिधींना फटकारणाऱ्या न्यायालयीन निर्णयांचे सामन्यातून स्वागतच होत असते. राजकारणी संतुलित, निपक्ष विचार करुच शकत नाही ही धारणा भारतात रुढ झालेली आहे.

सरकारचं वर्चस्व असलेल्या पध्दतीत किंवा नंतरच्या कॉलेजियम पध्दतीत त्रुटी होत्या आणि आहेत. या दोन्ही पध्दतीतून देशाला अनेक नामवंत आणि आपल्या निर्णयांनी लोकशाही बळकटी करणारे न्यायाधीश दिले हे नाकारता येत नसले तरी न्यायव्यवस्थेच स्वातंत्र्य, मान्य करुनही सुधारणांची गरज संपत नाही. खास करुन पारदर्शकता आणि उत्तरदायित्वांच तत्व मानणारी यंत्रणा आवश्यकच ठरते. नियुक्तीत वरचष्मा न्यायव्यवस्थेचा राहिला तरी इतर घटकांचा त्यात संबंधच नको ही भुमिका न्यायिक स्वातंत्र्याचा बंदिस्त अर्थ लावणारी आहे, योग्य आणि पात्रता असलेल्या कोणाची संधी डावलली जाऊ नये आणि कोणत्याही चुकीच्या व्यक्तींची नियुक्ती होऊ नये हे करतांना परदर्शकता राहावी हे जर निकष कोणत्याही नियुक्ती प्रक्रियेला लावला तरी न्यायाधिशांच्या नियुक्तीत योग्य पध्दतीसाठी अजून खुप पल्ला गाठायचा आहे आता सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतरही पुन्हा घटनादुरुस्तीच्या मार्गाने जायचे का न्यायालयाने सुचविलेल्या सुधारणांच्या सुचना करण्याच्या मार्गाचा सकारात्मक विचार करायचा हे सरकारला ठरवायचा आहे.

संदर्भ

1) राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग कायदा, भारत सरकार, 2015
2) डॉ. दुर्गा दास बसु, 'इंट्रोडक्शन टु द कॉन्स्टीट्युशन ऑफ इंडिया' 20th एडिशन लेक्झिस नेक्झिस बटरवर्दस रिंप्रिंट वाढवा नागपूर.
3) डॉ.भास्कर लक्ष्मण भोळे, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, 2013 कॉन्टिनेंटल प्रकाशन नागपूर.
4) 99 वी घटनादुरुस्ती कायदा 2015.

5) 24 वी, 25 वी, 29 वी, 42 वी, 44 वी, घटना दुरुस्त्या.

6) प्रा.उल्हास बापट, संसद न्यायालये आणि संविधान, 23 ऑक्टोबर 2015, सकाळ औरंगाबाद.

7) श्रीराम पवार, 'अधिकारांचा लढा' सप्तरंग सकाळ, 25 ऑक्टोबर 2015

8) योगेंद्र यादव, सुहास पळशीकर, पीटर डिसूझा, (अनुवाद मनोहर), 26 जानेवारी 2010, भारतीय उपखंडातील वैशिष्ट्यपूर्ण लोकशाहीचा शोध, समकालीन प्रकाशन पुणे. पृष्ठ 43,43.

9) सुहास पळशीकर/मराठी रिडींग मटेरियल सिरीझ, नं.1, भारताच्या राजकारणाचा ताळेबंद, 2009, सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड स्टडीज इन इंडियन पॉलिटीक्स डिपार्टमेंट ऑफ पॉलिटीक्स ॲड पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, युनिवर्सीटी ऑफ पुणे , पेज 41, 42, 43, 44, 45.

**लेखकाचा परिचय**

राज्यशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक, देगलूर महाविद्यालय देगलूर "छोट्या राज्यांचा प्रश्न : विदर्भ व तेलंगणा यांचा समिक्षात्मक अभ्यास" या विषयावर Ph.D. संशोधन पूर्ण, नवभारत सत्याग्रही विचारधारा, जडण-घडण, सुगावा, लोकप्रशासन पत्रिका या मासिकांमधुन लिखाण इत्यादी.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded